नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २३/०७/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक २२/०७/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पो.स्टे. बोरी परिसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन ०५.३० वा. ते ०६.३० वा. दरम्यान एम. एच.–३५/ एजे– १४९१ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी क्र. १) राहुल लोकेश रहागडाले, वय २१ वर्ष, रा. गौतम बुध्द वार्ड ता. तिरोडा जि. गोंदीया यास ताब्यात घेतले. त्याच्या वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये ५ (बैल) जनावरे कि. ५०,०००/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण किंमती ५,५०,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच आरोपी क्र. २) महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. एमएच– ३५/ एजे– १४९१ चा मालक रा. गोंदीया हा अटक होण्यास बाकी आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदर महेश जाधव, स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा. यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१),११(१)(ह)११(१)(क)११(१)(ब) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम सहकलम ५(१),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १८४, १३०, १७७ मोवाका तसेच कलम १०९ भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुरेश धवराळ मो.क्र. ९७६५४९७००५ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोहवा महेश जाधव, पोना अमृत किनगे, पोना मयुर ढेकले व चालक हवा अमोल कुथे यांचे पथकाने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर